# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियत, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## कुलसचिव यांचेकार्यालय

एम.आय.डि.सी. रोडकॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५


जावक क्रमांक/गो.वि./कु.स.का./९५०४ /२०२१ — दिनांक २०/१०/२०२१ २२

## परीपत्रक

**विषय — 100% केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन 2021-22 साठी अंमलबजावणी करणेबाबत.**

संदर्भ — मा. संचालक कार्यालयाचे पत्र क्र. उशिसं2020/सिएसएस/शिष्यवृत्ती/5903 दिनांक 11/09/2020

उपरोक्त मा.संचालक कार्यालयाचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की,महाराष्ट्र राज्य माध्यमीक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता 12 वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी 7417 इतके नविन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजुरीचे आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परीस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नविन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येईल.

केंद्रशासनामार्फत नविन शिष्यवृत्तीसाठी व नूतनिकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत **दिनांक 30 नोव्हेंबर 2021**अशी निर्धारित करण्यात आलेली आहे. शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सुचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करण्याबाबत सुचीत करण्याबाबत तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन/सुधारित प्राप्त सुचनांसाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळाचे व मा.संचालक कार्यालय, पुणे www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करण्याबाबतच्या सुचना महाविद्यालयीन स्तरावरून विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

सोबत — संदर्भीय पत्र

22/10/2021
(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी —

1. मा.कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2. मा. प्र-कुलगुरू, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3. मा.वित्त् व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
4. सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
5. पदव्युत्त्र शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
6. संगणक प्रमुख सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थ्ळावर अपलोड करावे.

(डॉ. हेमंत के. बारसागडे)
उपकुलसचिव (विद्या विभाग)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली